# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०७/०१/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या गांजा अंमलीपदार्थ ताब्यात बाळगुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी विक्री करणाऱ्या एका महिला व इसमाविरुध्द कारवाई केलेबाबत ”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०६/०१/२०२१ रोजी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या गांजा हा अंमली पदार्थ ताब्यात बाळगुन त्याची गिऱ्हाईकास विक्री करणाऱ्या एका महिला व इसमाविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०६/०१/२०२२ रोजी सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत प्रेरणा ११ बी बिल्डींगमध्ये, रुम नंबर २१६, दुसरा मजला, ओटास्किम, निगडी, पुणे येथे एक महिला ही अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी गांजा हा अंमली पदार्थ ताब्यात बाळगुन त्याची गिऱ्हाईकास विक्री करीत आहे. अशी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी निगडी पोलीस स्टेशन हद्दीत १४:०० वा चे सुमारास सापळा रचुन छापा टाकुन खालील मुद्देमाल महिला आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) १,४६,७५०/- रु किं चा एका पांढऱ्या रंगाच्या नायलॉन पोत्यामध्ये ५.८७० किलो ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ प्रत्येकी २५,०००/- रु किलो प्रमाणे.

-----------------------------------

**असा एकुण १,४६,७५०/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन एका महिला तसेच त्या महिलेला गांजा अंमली पदार्थ विक्री करीता उपलब्ध करुन देणारा इसम **पाहिजे आरोपी नामे** २) आबा पवार वय अंदाजे ४० वर्षे रा. जामखेड जि. अहमदनगर (पुर्ण नाव पत्ता माहित नाही) यांचेविरुध्द निगडी पोलीस स्टेशन येथे गुरनं ०८/२०२२ गुंगीकारक औषधिद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८(क),२०(ब)ii(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास निगडी पोलीस स्टेशन करीत आहे. सदर गुन्ह्यात महिलेला अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने दिनांक १०/०१/२०२२ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभाग व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षातील पोनि श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि श्री. धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, संतोष बर्गे, सुनिल शिरसाट, नितीन लोंढे, मारुती करचुंडे, योगेश तिडके, गणेश कारोटे, भगवंता मुठे, सचिन गोनटे, राजेश कोकाटे, वैष्णवी गावडे, स्वप्निल खेतले, जालिंदर गारे, नामदेव राठोड,अमोल शिंदे, सुमित डमाळ यांनी केली आहे.

